शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष बारावे : अंक छत्तीसावा । ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२३

## भारत आणि मॉरिशस आंतरसांस्कृतिक संबंध विशेषांक भाग-२



शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

**वर्ष बारावे : अंक छत्तीसावा**

**ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०२३**

# भारत आणि मॉरिशस आंतरसांस्कृतिक संबंध

## विशेषांक - भाग २

**• संपादक •**

नंदकुमार मोरे

**• अतिथी संपादक •**

प्रकाश दुकळे । भरत जाधव । मांतेश हिरेमठ

**• संपादक मंडळ •**

जयवंत दळवी । देवानंद सोनटक्के । सुभाष पाटील । बळवंत मगदूम

**• प्रकाशक •**

**भरत जाधव**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

द्वारा : द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे,

ता. जि. सातारा ४१५५१९

**• मुद्रक •**

भारती मुद्रणालय

८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी ४थी गल्ली, कोल्हापूर.

फोन नं.: ०२३१-२६५४३२९

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. भरत जाधव, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथे छापून द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे,ता. जि. सातारा ४१५५१९येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | संस्कृती आणि भाषाभ्यास : डॉ. अनिल गवळी | ०४ |
| २. | शिविम ग्लोबल झाली हो ...! : डॉ. शिवकुमार सोनाळकर | ०८ |
| ३. | मॉरिशसमधील आपला समाज आपली माणसे : डॉ. मधुमती कुंजल | १७ |
| ४. | मॉरिशस आणि मराठी नाटक : डॉ. प्रकाश दुकळे | २४ |
| ५. | मॉरिशसमधील मराठी कथेतून घडणारे सांस्कृतिक दर्शन : डॉ. सुभाष वाघमारे | २८ |
| ६. | मॉरिशसमधील मराठी कथा : डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात | ३६ |
| ७. | मॉरिशसमधील मराठी कवितेचे स्वरूप : डॉ. मांतेश हिरेमठ | ४४ |
| ८. | मॉरिशसमधील लग्नविधी : डॉ. शिवाजी महादेव होडगे | ५० |
| ९. | भारत मॉरिशस आंतरसांस्कृतिक संबंधांचा तौलनिक अभ्यास : डॉ. भरत जाधव | ५४ |
| १०. | भारत आणि मॉरिशस तौलनिक साहित्याभ्यास : डॉ. जयश्री बाबर | ६८ |
| ११. | महाराष्ट्र संस्कृतीचा मॉरिशस संस्कृतीवरील प्रभाव : डॉ. रामा रोकडे | ७५ |
| १२. | मॉरिशस संस्कृतीवरील शिवतत्त्वाचा प्रभाव : डॉ. सिद्धमल्लय्या हिरेमठ | ८० |
| १३. | कोकणची जाखडी मॉरिशसमध्ये झाकरी : सांस्कृतिक संबंध : डॉ. विजयालक्ष्मी देवगोजी | ८५ |
| १४. | मॉरिशसमधील देवदेवता व त्यांच्या उपासना पद्धती : डॉ. धनंजय होनमाने | ९४ |
| १५. | भारत आणि मॉरिशस यांच्यातील सांस्कृतिक व भाषिक संबंध : डॉ. मानसी जगदाळे | ९९ |
| १६. | मॉरिशस आनी गोंय कोंकणी भाशीक समाज संदर्भांचो सोद : डॉ. पूर्णानंद चारी | १०५ |
| १७. | भारत आणि मॉरिशस यांच्यातील आंतरसांस्कृतिक संबंध : प्रा. लक्ष्मी पवार | १११ |
| १८. | अहवाल | १२१ |

# मॉरिशसमधील मराठी

डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात

**प्रस्तावना**

आजच्या काळातील माणसाची आकाशाला गवसणी घालण्याइतपत झालेली प्रगती पाहाता; त्यामागील संस्कारांचा वाटा महत्त्वाचा ठरतो. आपल्या देशानेही मंगळ, चंद्र व सूर्य या ग्रह-ताऱ्यांवर यान सोडून आपणही तंत्रज्ञानात अग्रेसर असल्याचे सिद्ध केले आहे. या संस्कारांचे प्रभावी साधन म्हणजे कथा. अगदी चिऊ-काऊच्या गोष्टींपासून राजा-राणीच्या, भूताखेतांच्या, राक्षसांच्या, देवादिकांच्या कथा या बालकांवर नैतिक संस्कार घडविण्याचे प्रभावी कार्य करीत असतात. व्यक्तींच्या वयानुसार कथेचे स्वरूपही बदलत जाते. अबोध वयातील बालसुलभ भावनांपासून महाविद्यालयीन विद्वत्तापूर्ण तत्त्वज्ञान सारख्याच ताकदीने पेलण्याचे सामर्थ्य कथेजवळ आहे.

परिवर्तन हे मानवी जीवनाचे जिवंतपणाचे लक्षण आहे. त्या अनुषंगाने मराठी कथेतही आमूलाग्र परिवर्तन झाले. तिचे विषय, आशय, स्वरूप, भाषा, मर्यादा सारे काही बदलले. मराठी कथाही त्यास अपवाद नाही. ती महाराष्ट्रातून परदेशस्थ मराठी भाषिक बांधवांपर्यंत पोहोचली. संगीता मोहिते म्हणतात, ''जन्माने, वंशाने, वर्णाने भारतीय असणारा मराठी भाषिक समूह परदेशात वास्तव्यास आहे. परदेशातील दीर्घकालीन वास्तव्य आणि मायभूमीपासूनचे तुटलेपण या दोन मनोवस्थांचे चित्रण कथा, कविता, कादंबरी, नाटक या मुख्य वाङ्मय प्रकारांतून शब्दबद्ध केले आहे.''[१]

**मराठी कथेचे बदलते स्वरूप**

अगदी सुरुवातीच्या काळात रत्नाकर (१९२६), यशवंत (१९२८), किर्लोस्कर, जोत्स्ना, समीक्षक, प्रतिमा, करमणूक, विविधज्ञानविस्तार, स्त्री, महिला, संजीवनी (पाक्षिक), मनोरमा, गृहलक्ष्मी, सरस्वती, मनोरंजन या कथेला वाहिलेल्या मासिकांच्या काळात बहरलेली मराठी लघुकथा पुढे सत्यकथा, अभिरुची, मौज, साहित्य या मासिकांतून आशय व अभिव्यक्तीमध्ये बदल करत नवकथेचे रूप घेऊन मराठी कथा अवतीर्ण झाली. चाकोरीतून तिला मुक्त करण्याचे काम नवकथेने केले. लघुकथा, दीर्घकथा, ग्रामीणकथा, नागरकथा, विनोदीकथा, नवकथा अशी अनेक स्थित्यंतरे करीत मराठी कथेने २१ व्या शतकात पदार्पण केले आहे. आजच्या नवसहस्रकाच्या काळात ती पुस्तकांबरोबरच ब्लॉग्ज, व्हॉट्सअप, ट्विटर, इन्स्टाग्राम, टेलिग्राम, ई-बुकच्या माध्यमातूनही वाचकांच्या समोर येते. आजच्या कथेची शीर्षकेही


ISSN No. 2319-6025

बदलल्याचे आपणास दिसून येते. उदा. जून २०२३ मध्ये प्रकाशित झालेल्या ग्रामीण कथासंग्रहाचे शीर्षक 'गावानं केलंय मतीतून लॉगडाऊन' असे आहे. अशी इंग्लिश शब्दांची सरमिसळ करून शीर्षके बनविण्याचा नवकथाकार तरुणांचा कल दिसतो.

अशा काळातही परदेशस्थ भारतीय मराठीमधून कथालेखन करतात ही गोष्ट मराठी भाषिकांसाठी आनंद देणारी आहे. डॉ. अनंत लाभसेटवार (न्यू जर्सी, अमेरिका) यांचे हुंकार, तरंग, घरट्यापलीकडे, डॉ. प्रकाश लोथे (रिचमंड, अमेरिका) यांचे ऊनपाऊस, हास्यरेखा, अविवा मिलर (लूद, इस्रायल) यांचा मध्यान्हीच्या सावल्या, अजिता काळे व अशोक काळे (अमेरिका) या दाम्पत्याचे दूरदेशीच्या गोष्टी, घडलेली कथा, डॉ. ललिता गंडभीर (अमेरिका) यांचे तारेवरची कसरत, पश्चिमगंध, संध्या कर्णिक (अमेरिका) यांचा कुणास्तव कुणीतरी, डॉ. उषादेवी कोल्हटकर (अमेरिका) यांचा फुलांना घर नसतं, सुधीर कुलकर्णी (अमेरिका) यांचा सेतू असे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. तसेच कॅनडास्थित मराठी कथाकारांमध्ये जयश्री भट यांचे मावळतीची झाडे, मानवाचे वरदान, स्मिता भागवत यांचे व्यथा व्यक्त होताना, तिची कथाच वेगळी, परक्या भूमीवर घर, विद्युल्लेखा अकलूजकर यांचा दर्पणी पाहता रूप हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. आपले मराठी भाषेवरील प्रेम व्यक्त करताना डॉ. प्रकाश लोथे म्हणतात, 'माझ्या धमन्यातून अजूनही भगवं रक्त वाहात आहे. माझा मराठमोळेपणा मला मातेच्या दुधातून मिळालाय. माझ्या मेंदूतल्या प्रत्येक पेशीवर मराठी शब्द कोरले आहेत. तुकोबाचे शब्द, गदिमांचे रामायण अन् शिवबाचे पोवाडे माझ्या हृदयात भिनले आहेत. त्यातून इंग्रजी शब्द ओरबडून काढावे लागतात.'[२] मॉरिशसमधील मराठी कथांचा आपण पुढे आढावा घेणार आहोत.

**'छोटा हिंदुस्तान' मॉरिशसचे मराठी भाषेवरील प्रेम**

मॉरिशस; हिंदी महासागरातील द्वीपसमूहांचा देश. यामध्ये मॉरिशस बेट, रोड्रीगेस बेट, आगालेगा बेटे, सेंट ब्रांडन द्वीपसमूह यांचा समावेश होतो. मॉरिशस हे यांतील सर्वात मोठे व प्रमुख बेट असून त्यावरूनच देशाला मॉरिशस असे नाव पडले आहे. मॉरिशसमध्ये १९ व २० व्या शतकात फ्रेंच व इंग्रजांचे राज्य होते. मॉरिशसमध्ये दगडाखाली सोने सापडते, असे आमिष दाखवून इंग्रजांनी कोकणातून लोकांना तिथे नेले व गुलाम बनविले. मॉरिशसची बोलीभाषा फ्रेंच व तिच्यातून तयार झालेली 'क्रिओल' आहे. या भाषेवर भोजपुरी, हिंदी, तमिळ, तेलुगू, उर्दू व मराठी या भाषांचा प्रभाव आहे. मॉरिशसमध्ये पन्नास हजार मराठी भाषिक आहेत. तिथे १९६५ पासून प्राथमिक शाळेत मराठी शिकवली जाते. त्यानंतर मराठी भाषा माध्यमिक व उच्च शिक्षणात समाविष्ट झाली. २००२ पासून मराठी विषयात पदवी अभ्यासक्रम सुरू केले

आहेत. तेथील म. गांधी इन्स्टिट्यूट ही संस्था भारतीय भाषांसाठी काम करत आहे. मॉरिशसमध्ये १८० वर्षांपासून मराठी संस्कृती आहे. पूर्वजांनी कुलदैवत, भाषा, संस्कृती दशावतार, जागरण, गोंधळ ही सारी परंपरा जोपासली आहे. संक्रांत, गुढीपाडवा महाराष्ट्र दिन, शिवजयंती, गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी हे सणही तिथे उत्साहात साजरे केले जातात. तेथील मराठी बांधव स्वतःला 'मॉरिशस मराठी' असे संबोधतात अशा शब्दांत मॉरिशस मराठी सांस्कृतिक केंद्राचे अध्यक्ष अर्जुन पुतळाजी भावना व्यक्त करतात. मराठी घरात मराठी व क्रिओल ही भाषा बोलली जाते. तेथील सरकारच्या कला-संस्कृती विभागात मराठी भाषिक संघ स्थापन झाला आहे. मराठीसाठी तेथील सरकार निधी देते. मराठीच्या ज्येष्ठ अभ्यासक, स्नेहवर्धन रिसर्च इन्स्टिट्यूटच्या अध्यक्ष डॉ. स्नेहल तावरे यांच्या कवितांचा मॉरिशसच्या ग्रेड सातवी आणि नववीच्या अभ्यासक्रमात समावेश केला गेला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तेथील विद्यार्थी पीएच.डी. करीत आहेत. नुकतेच २ व ३ डिसेंबर २०२३ रोजी मॉरिशसमध्ये कोंकण मराठी साहित्यसंमेलन उत्साहात पार पडले. तसेच यावर्षी २८ मे २०२४ रोजी स्वा. सावरकरांच्या जयंतीनिमित्त तिथे स्वातंत्र्यवीर सावरकर विश्वसंमेलनाचे आयोजनही केले जाणार आहे. अशा प्रकारचा मराठी भाषा आणि मॉरिशसचा भाषिक अनुबंध आहे. त्यामुळेच मॉरिशसला 'छोटा हिंदुस्तान' म्हणून संबोधले जाते.

**मॉरिशसमधील मराठी साहित्य**

मॉरिशसमध्ये मराठी भाषेवर प्रेम करणारे लोक जसे आहेत, तसे मराठीतून साहित्यनिर्मिती करणारे साहित्यिकही आहेत. डॉ. बिदन आबा, सोना धर्म्या, रत्नाबाई लक्ष्मण, श्रीराम, सुना धर्मिया अशा काही मराठी साहित्यिकांची नावे सांगता येतात. डॉ. बिदन आबा हे कथाकार व कादंबरीकार आहेत, श्रीराम कवी; तर धर्मिया नाटककार आहेत. त्यांनी १२५ नाटकांची निर्मिती केली आहे. या लेखकांमध्ये रत्नाबाई लक्ष्मण यांच्याशी काही वर्षांपूर्वी संवाद साधण्याची महाराष्ट्र टाइम्सला संधी मिळाली होती, त्यावेळी त्या म्हणाल्या होत्या, 'मूळचे मराठी असलो तरी लहानपणापासून मराठीची आवड निर्माण झाली आहे. आम्ही दूर राहात असलो तरीही महाराष्ट्राबद्दलची आस्था कमी होत नाही. शाळेत मराठी शिकले होते. त्यानंतर मराठी साहित्यिकांचा, इथल्या लेखकांचा प्रभाव माझ्यावर पडत गेला. आजही काही शब्दांची अडचण होत असली तरीही मराठी लिहिण्याची आवड निर्माण झाल्याने एकांकिका, नाटक, नाट्यछटा लिहावे असे मनात आले आणि काही कलाकृतींना न्याय देऊ शकले. सरकारी शाळेत शिक्षिका असल्याने अनेक मराठी वंशाच्या विद्यार्थ्यांना नाट्यछटांच्या माध्यमातून शिकवण्याचा प्रयत्न करते. याहीपुढच्या काळात मराठी नाटकांचे लेखन करण्याचा


ISSN No. 2319-6025

मानस केला आहे.'[३] रत्नाबाई यांनी लिहिलेल्या दत्तक या नाटकाचा प्रयोग पुण्यात झाला होता, त्या नाटकात रत्नाबाई यांनी स्वतः अभिनयही केला होता. तसेच मुंबईमध्ये भरलेल्या जागतिक मराठी परिषदेसाठी प्रमुख पाहुण्या म्हणून मॉरिशसच्या उद्योग, स्त्रियांचे हक्क व कुटुंबकल्याण विभागाच्या मंत्री सौ. शीलाबाय बापू यांना आमंत्रित केले होते. त्यांना तिथे 'मॉरिशस बेटावरील 'राणी लक्ष्मीबाई' या नावाने गौरवतात. म्हणजे तेथे उपमा देतानाही आपल्याकडील वीर व झुंजार स्त्रियांच्या नावाचाच वापर केला जातोय, हे महाराष्ट्रासाठी भूषणावह आहे, असे मला वाटते. प्र. श्री. नेरूरकर म्हणतात, 'झाशीच्या राणीबद्दल सर ह्यू रोजने जे उद्‌गार काढले तेच उद्‌गार शीलाबायबद्दल काढणे उचित ठरते. She was the only brave man on the side of the enemy, सर रोज म्हणाला होता. तेव्हाच नव्हे तर आजही सौ. शीलाबापूना हे उद्‌गार जसेच्या तसे लागू पडतात.'[४] नेरूरकर पुढे म्हणतात, 'आपल्या मुलींनी आपल्या पूर्वजांनी मराठी भाषा विसरू नये, याकडे ती कटाक्षाने लक्ष देते. दोघींनाही (दोन मुलींना) घरी मराठी भाषेची शिकवण मराठी शिक्षकांमार्फत देते. बेटावरील अन्य भारतीय भाषांबरोबर मराठीचा विकास होण्याकडे लक्ष देते.'[५] शीलाबापू यांच्या मराठीवरील प्रेमाला आपण महाराष्ट्रीयन लोकांनी सलामच करायला हवा, असे मला वाटते.

**मॉरिशसमधील मराठी कथा**

डॉ. बिदन आबा, सोना धर्मीया, आन्शा कृष्णा, प्रेम ज्योती बापू, अंजू मालू, विमला बाय कुश्रिया, कुलदीप आबा, सदाशिव महादू, एल्विना अप्पा रामा, चित्राबाई इत्तू, संगीता डोंगरे, हंसराज मालू, राजेन रामा, अनुसया मालू, प्रियत्तमा इत्तू, रमिला रामा, दीपक मांडू या लेखकांनी मराठी कथा लिहिलेली आहे. मॉरिशसमधील महात्मा गांधी संस्थेच्या मराठी विभागाने आयोजित केलेल्या मराठी कथालेखन स्पर्धेतील कथा संकलित करून, त्याचे 'मॉरिशसमधील मराठी कथा' असे पुस्तक डॉ. बिदन आबा यांनी संपादित केले आहे. यात एकूण १६ कथा आहेत. या कथांमधून निदर्शनास येणारी काही निरीक्षणे अशी मॉरिशसमधील जनतेचे भारताविषयीचे व महाराष्ट्राविषयीचे प्रेम सर्वश्रुत आहेच; मग इथे ते कथेतूनही दिसले नाही तरच नवल! 'प्रेम' या सोना धर्मीया यांच्या कथेतील सदानंद मॉरिशसमधील मराठी गृहस्थ असला तरी; स्नेहलता ही महाराष्ट्रीयन मुलगी आहे. या दोघांचे प्रेम बहरते पण, तडीस जात नाही. सदानंदच्या मनातील प्रेमाचे वर्णन करताना लेखिका म्हणते, 'ह्या महाराष्ट्रीयन तरुणीला पाहाताच त्याच्या मनातला मोगरा फुलायला आरंभ झाला होता' (पृ. क्र.१०). या वर्णनातून मॉरिशसमधील व्यक्तीचे महाराष्ट्रीयन तरुणीविषयीचे आकर्षण तर दिसून येतेच; शिवाय कथेतील नायक-नायिकेची नावेही भारतीय आहेत, हे प्रकर्षाने जाणवते. तसेच प्रेम

ज्योती बापू यांच्या 'आईचा अंगठा' या कथेतील गजानन आणि निर्मला यांच्या मुलाचे नाव निळकंठ आहे. तर अंजू मालू यांच्या 'मुक्तिची कथा' मधील मुक्तीला बारावीच्या परीक्षेत पहिली आल्याने तिला सरकारकडून उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळून महाराष्ट्रात शिकण्याची संधी प्राप्त होते. लेखिका म्हणतेही, 'भारतात जाणे मुक्तीचे स्वप्न होते. मुक्तीला बालपणापासून महाराष्ट्रात जाण्याची इच्छा होती. वयात आपल्या शिक्षकांकडून महाराष्ट्रावरील इतिहास, तेथील गोष्टींवर माहिती मिळाल्याने मुक्तीच्या मनात, एकदातरी आपण भारतात जाऊन महाराष्ट्राचे दर्शन घ्यावे, असा विचार आला होता'(पृ. क्र.३८). ती महाराष्ट्रात येऊन शिक्षणही घेते आणि त्यांच्या देशातून महाराष्ट्रात शिक्षणासाठी आलेल्या शशांकशी लग्न करते.

विमला बाय कुश्रिया यांच्या 'कष्टाचे फळ नेहमी गोड असते' या कथेतील पात्रांची नावे बलराम, त्याची पत्नी उमाबाई व मुले राहुल व रीमा अशी आहेत. मुलांना आई उमाबाई रामायण, महाभारतातील व छत्रपती शिवाजी महाराजांच्या गोष्टी सांगत असे. राहुलला बारावीत चांगले गुण मिळाल्याने त्याला सरकारची शिष्यवृत्ती मिळून उच्चशिक्षणासाठी पुण्यात प्रवेश मिळतो. राहुलप्रमाणेच कुलदीप आबा यांच्या 'इशीता राव' कथेतील इशीता राव आपल्या मुलाला (राज) शोधत-शोधत भारतात येते. ती पोलिसांना म्हणते, 'माझे नाव इशीता राव आहे. माझा मुलगा राज हा हरवलेला आहे. तो शिकण्यासाठी भारतात आलेला आहे. त्याला शिष्यवृत्ती मिळाली आहे. पुण्यात येऊन मराठी शिकावे आणि मोरिशसच्या विद्यापीठात व्याख्याता म्हणून काम करावे हे त्याचे स्वप्न होते' (पृ. क्र.४९). अशी एकुलत्या एका मुलाला शोधत आलेल्या आईची हृदयद्रावक कथा कुलदीप आबा यांनी लिहिली आहे. राजला शिष्यवृत्ती मिळतेही. तो व आई दोघे विमानतळाकडे निघाले असताना गाडीला अपघात होतो. त्यात राज व ड्रायव्हर दगावतो; आई कोमात जाते; ती शुद्धीवर येते तेव्हा मुलाला शोधत भारतात येते. मुलाचा मृत्यू झाल्याचे तिला मान्यच नसते.

वरील दोन्ही कथांतील राहुल, राज ही नावे जशी भारतीय वाटतात तशीच एलिझा अप्पा रामा यांच्या 'आईविना जीवन' या कथेतील आरती व अवनी, चित्राबाई यांच्या 'जीवन संघर्ष' या कथेतील रजनी, सुरेश, हंसराज मालू यांच्या 'पश्चाताप' या कथेतील संभाजी, रमेश, सावित्री, वीणा, अनुसया मालू यांच्या 'हण्ड्सम बनण्याचा उपाय' या कथेतील दीपक, विनोद, सचिन, राकेश, विस्मय, विक्रम, प्रियतमा यांच्या 'आकांक्षा' या कथेतील आकांक्षा, रमिला रामा यांच्या 'एका विधवेचे जीवन' या कथेतील प्रणिता ही सर्व नावे भारतीय आहेत.

मॉरिशसमधील जनतेचे भारताविषयी व महाराष्ट्राविषयी जसे प्रेम आहे तसेच

 ISSN No. 2319-

मराठी साहित्यावरही असल्याचे दिसून येते. त्यामुळेच मराठी कथा लिहून त्या प्रसिद्ध करण्याचे दिव्य काम तेथील मराठी प्रेमींनी केले आहे. या प्रेमापोटीच 'मॉरिशसमधील मराठी कथा' या पुस्तकाचे संपादक डॉ. बिदन आबा यांनी आपल्या मनोगतात म्हटले आहे, 'महाराष्ट्रातून पूर्वाश्रमी मजूर म्हणून आपल्या भवितव्याच्या शोधात मॉरिशसमध्ये आलेल्या पूर्वजांना ज्यांनी मराठी भाषा आणि संस्कृती हा मोलाचा वारसा आमच्यापर्यंत पोहोचविलेला आहे, त्यांना आदरांजलीच्या स्वरूपात लघुकथांचा हा पुष्पगुच्छ समर्पण आहे.'[६] या मनोगतातून संपादकाचे मराठी भाषा आणि संस्कृतीवरील प्रेमच दिसून येते.

या संग्रहातील कथांमधूनही मराठी साहित्याची छबी डोकावताना दिसते. त्यामुळेच 'प्रेम' या कथेतील नायिकेच्या हातात 'मोगरा फुलला' हे मराठी पुस्तक देण्याचा मोह लेखिकेला होतो. स्नेहलता ही नायिका ज्ञानेश्वरांच्या साहित्यावर संशोधन करीत असते. तर दीपक पांडू यांच्या 'राजा दीपराज आणि राणी सुलक्षणाची प्रेमकथा' या कथेमध्ये रामदासांच्या मनाच्या श्लोकाचा दाखला येतो.

'मनी मानव व्यर्थ चिंता वहाते
अकस्मात होणार होऊनि जाते
घडे भोगणे सर्वही कमयोगे
मतिमंद ते खेद मानी वियोगे' (पृ. क्र.१०८)

यातून मॉरिशसमधील जनतेची संतांच्या विचारांची ओढच दिसून येते. 'आईविना जीवन' या कथेतील निवेदिकेलाही सावत्र आईच्या वागण्याने दुःख होते. आपल्या आईची महती सांगताना तिला सरोजिनी बाबर यांच्या 'आईच्या कुशीत' या कवितेची आठवण होते. ती स्वतःशीच गुणगुणतेही,

'आईच्या कुशीत, जगले निवांत,
कधी ना भासली कशाचीच भ्रांत.' (पृ. क्र.६१)

या प्रसंगातूनही मॉरिशसमधील नागरिकांना मराठी कवितेची ओढ असल्याचे दिसून येते. दीपक पांडू यांच्या 'राजा दीपराज आणि राणी सुलक्षणाची प्रेमकथा' या कथेवर आपल्याकडील राजा – राणीच्या कथेचा प्रभाव असल्याचे जाणवते. मॉरिशसमधील मराठी कथेचा विचार करताना डॉ. आनंद पाटील यांचे पुढील मत विचारात घ्यावेसे वाटते, 'हे युग संस्कृती संकराचे आहे. बहुभाषिकता आणि आंतरसंहितांची भेसळ वाढल्याने मिश्रण, रीमिक्स आणि गिमिक्स लोकप्रिय ठरत आहेत. प्राचीन कथन पद्धतींची भेसळ वेगवेगळ्या पद्धतीने होत आहे. प्रसारमाध्यमांच्या प्रभावामुळे कथा प्रकारांचे जुने ढाचे व वाङ्मय प्रकारांच्या सीमा पूर्णपणे बदलत आहेत.'[७] हे मत विचारात घेतल्यास मराठी आणि क्रिओल भाषेचा इथे संकर झाल्याचे दिसते.

सदर कथासंग्रहातून भारत आणि मॉरिशस या दोन्ही देशांतीय अनुबंधही अभ्यासता येतो. मॉरिशसमधील लोकांनी मराठी संस्कृती, भाषा, धर्म टिकवून ठेवलेला आहे. 'प्रेम' या कथेमध्ये महात्मा गांधी संस्थानच्या वतीने २ ऑक्टोबरला महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. लेखिका म्हणते, 'एम.जी.आय.चे. डायरेक्टर श्री. उत्तम विष्णुदयाल यांचे भाषण झाले. तद्नंतर भारतीय उच्चायुक्तांचे भाषण झाले. नंतर मॉरिशस लेखकांनीही आपापली भाषणे दिली. त्या सर्व वक्त्यांनी महात्मा गांधीजींच्या आध्यात्मिकतेबद्दल भर दिला. त्यांच्या अहिंसा वृत्तीमुळे आज ते जगासाठी आदर्श होत गेले आहेत. सारे जग महात्मा गांधींच्या साध्या स्वभावाचे गुण गात आहेत' (पृ. क्र.१७). तर 'आईचा अंगठा' या कथेची सुरुवात अशी आहे, 'हिंद महासागराच्या अनेक छोट्या छोट्या बेटांपैकी मॉरिशस नावाच्या एका बेटावर घडलेली ही अपूर्व गोष्ट आहे. या बेटावर काही २०० वर्षांपूर्वी ब्रिटिश लोकांनी शेतमजूर, साफसफाई, बांधकाम इ. कामांसाठी आफ्रिका, मादागास्कर, भारत इ. वेगवेगळ्या देशांतून लोक आणले होते. तेव्हापासून या छोट्याशा बेटावर अनेक धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहू लागले..... ना जात-पात, ना उच्च-नीच. सगळे समान. हिंदू असो, ख्रिश्चन असो किंवा मुसलमान असो (पृ. क्र.२९). अशा सर्वधर्मीय लोकांमध्ये भारतीय व महाराष्ट्रीयन संस्कृती टिकवून ठेवण्याचे काम मॉरिशसमधील मराठी लोकांनी केले आहे. आपल्या रामायण व महाभारत या ग्रंथांचाही प्रभाव मॉरिशियन लोकांवर आहे. 'मुक्तिची कथा' या कथेची सुरुवात अशी आहे, 'कर्म करा. फळाची अपेक्षा करू नका!' असे श्रीवासुदेव कृष्णांनी, ज्ञानेश्वरीच्या माध्यमाने सर्वसामान्यांसाठी धर्माचा प्रसार आणि प्रचार केला आहे' (पृ. क्र.३६). तर संगीता डोंगरे यांच्या 'धर्मांतर' या कथेमध्ये लेखिका म्हणते, 'आपल्या धर्माला वाचवण्याचा ठेका काय, फक्त संतांनी आणि शिवाजी महाराजांनी घेतला होता?' (पृ. क्र.७७) यातून लेखिकेने धर्मांतराकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे.

अशा प्रकारे भारत आणि मॉरिशस यांचा सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, साहित्यिक अनुबंध पाहावयास मिळतो.

सदर कथासंग्रहाच्या माध्यमातून भाषाशैली आणि निवेदनशैलीचा विचार केल्यास 'कष्टाचे फळ नेहमी गोड असते', हे कथेचे शीर्षक सुविचाराच्या वळणाचे वाटते. भाषा साधी, सोपी असली तरी, जागोजागी इंग्रजी व क्रिओल भाषेचाही वापर केलेला आहे. 'राज राव' या कथेतील मुलाच्या वियोगाने हतबल झालेली आई, 'मो गॉसो इन पॅजी. मो पा पे त्रुव ली' (पृ. क्र.४९). अशी क्रिओल भाषेत बोलते. तर 'तो' या कथेतील 'तो दगडी ह्रदयाचा, नकारात्मक गुणांचा, 'कानटिक' माणूस व मत्सरी आहे' (पृ. क्र.८७). असा संवाद येतो तेव्हा 'कानटिक'चा अर्थ उलगडत नाही. काही ठिकाणी


ISSN No. 2319-6025

मराठी म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर दिसून येतो. निवेदनशैलीचा विचार केल्यास 'तो' ही कथा प्रथमपुरुषी निवेदनात्मक पद्धतीने साकारते, तर 'धर्मांतर' ही कथा भाषण वाटते. 'प्रेमळ म्हातारी आणि तिचं मांजर' या कथेतील म्हातारी पंचतंत्रातील गोष्टींप्रमाणे मांजरांशी संवाद साधते.

अशी वैविध्यपूर्णशैली कथासंग्रहातून पाहायला मिळते.

**निष्कर्ष**

१) कथासंग्रहातील कथांच्या विषयांत विविधता आढळते.

२) सदर कथांतून हलके-फुलके विषय हाताळलेले आहेत.

३) भारत आणि मॉरिशस यांचा सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, साहित्यिक अनुबंध अभ्यासता येतो.

४) कथासंग्रहातील कथांच्या निवेदनशैलीत विविधता आढळते.

५) प्रसंगानुरूप क्रिओल भाषेचा वापर केलेला दिसतो.

६) बऱ्याच कथांतील पात्रांना कॅन्सर झाल्याचे दिसून येते.

७) मॉरिशस मराठी माणसांचाही देवावर विश्वास दिसतो.

८) मराठी भाषेवरील प्रेम पानोपानी दिसून येते.

९) आपल्या रामायण व महाभारत या ग्रंथांचाही प्रभाव मॉरिशियन लोकांवर आहे.

**समारोप**

अशा प्रकारे या कथासंग्रहाच्या माध्यमातून मॉरिशस मराठी बांधवांनी माय मराठीची थोरवी वाढविण्याचा सार्थ प्रयत्न केलेला आहे, असे मला मनोमन म्हणावेसे वाटते.

**संदर्भ टीपा**

१) जोशी नीला (अ.संपा.) : शिविम संशोधन पत्रिका, अंक ३४ वा, एप्रिल-जून २३, भारती मुद्रणालय, कोल्हापूर, पृ. क्र. ५९.

२) जोशी नीला (अ.संपा.) : तत्रैव, पृ. क्र. १९.

३) महाराष्ट्र टाइम्सच्या इंटरनेटवरील बातमीतून.

४) नेरूरकर प्र. श्री. : 'मॉरिशस बेटावरच्या झुंजार मराठमोळ्या महिला मंत्री : शीलाबाय बापू' लोकराज्य, जागतिक मराठी परिषद विशेषांक, १९८९, पृ. क्र. ३९.

५) नेरूरकर प्र. श्री. : तत्रैव, पृ. क्र. ४१.

६) आबा बिदन : 'मॉरिशसमधील मराठी कथा' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१५, पृ. क्र.७.

७) पाटील आनंद : 'सृजनात्मक लेखन' पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००५, पृ. क्र. १७१.